ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016



Golden Research Thoughts

# महाराष्ट्रातील कडधान्ये उत्पादन :- नंदुरबार जिल्हा एक सुक्ष्म विश्लेषण

गावीत दिनेश जेरमा[1] , डी.जी.पाटील[2]
[1]संशोधक विदयार्थी , जी.टी.पाटील महाविदयालय,नंदुरबार
[2]संशोधक मार्गदर्शक , अर्थशास्त्र विभाग प्रमुख जी.टी.पाटीलमहाविदयालय,नंदुरबार





गावीत दिनेश जेरमा

**सारांश:-**
प्रस्तुत संशोधनामध्ये नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये पिकांच्या लागवडी खालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकतेचे महाराष्ट्रातील कडधान्ये लागवडी खालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकतेशी तुलनात्मक अध्ययन करण्यात आले आहे. तुलनात्मक विश्लेषणावरुन असे आढळते की, नंदुरबार जिल्हयात कडधान्य लागवडी खालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकतेत वाढ होत आहे. परंतू ही वाढ अतिशय मंद गतीने होत आहे. महाराष्ट्रामध्ये मुंबई वगळता सर्व जिल्हयामध्ये कडधान्ये उत्पादन कमी-अधिक प्रमाणात घेतले जाते. भारतात लोकसंख्या वाढीचा दर जास्त आहे. जगात लोकयंख्येचा बाबतीत भारताचा दुसरा क्रमांक लागतो. वाढत्या लोकसंख्येसाठी अन्नधान्याची गरज देखील वाढत जात आहे. त्याचप्रमाणे भारतीयांच्या दैनंदिन आहारात कडधान्याचा समावेश केला जातो. देशात वाढत्या लोकसंख्येबरोबर कडधान्याची मागणी देखिल वाढते. परंतू भारतात घेतल्या जाणाऱ्या कडधान्याच्या उत्पादनातून देशातर्गत कडधान्याला असणारी मागणी पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे सरकार मार्फत कडधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या जातात. यातुनच 2007-08 मध्ये भारतात “राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान” 17 राज्यामधील 476 जिल्हयामध्ये राबविण्यात आले. यात महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्हयाचा देखिल समावेश आहे. त्यामुळे नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये लागवडी खालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकतेत महाराष्ट्राच्या तुलनेत बदल होत आहे.



**बीजशब्द:-** क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता

**प्रस्तावना:-**

शेती अशी जीवन पध्दती आणि परंपरा आहे की, ज्याने भारतीय लोकांचे विचार, दृष्टीकोन, संस्कृती आणि आर्थिक जीवन प्राचिन काळापासून जुळलेले आहे. भारतीय नियोजनात शेतीला सामाजिक-आर्थिक विकासांशी संबंधीत सर्व घटकाचा केद्रबिंदू मानला गेला आहे.परंतू 60 व्या दशकात झालेल्या ‘हरित क्रांन्ति’ नंतर शेतीत फार मोठा बदलझालेला नाही.भारत कृषी प्रधान देश असून सुध्दा एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा हिस्सा सतत घटत आहे.

एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा हिस्सा (शे.प्रमाण)

| वर्ष | एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचे प्रमाण (शे.प्र) |
|---|---|
| 1950-51 | 56.5% |
| 1960-61 | 52.% |

| | |
|---|---|
| 1970-71 | 45.77% |
| 1980-81 | 39.60% |
| 1990-91 | 32.91% |
| 2000-01 | 26.10% |
| 2010-11 | 20.10% |

**संदर्भ:- आर्थिक सर्वेक्षण 2011-12**

भारतात 1950-51 मध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा हिस्सा 56.46% होतो.2010-11 मध्ये 20.10% पर्यंत घट झाली.

भारत कृषी प्रधान देश असून सुध्दा देशातील लोकसंख्येची अन्नधान्याची गरजपूर्ण करण्यासाठी अन्नधान्याची आयात करावी लागते.याचे प्रमुख कारण म्हणजे भारतातील शेतीची उत्पादन, उत्पादकता कमी आहे.अन्नधान्यामध्ये कडधान्याचा देखिल समावेश केला जाते.कडधान्याची पिके ही "डाळीची पिके" म्हणून ओळखली जातात. आहारामध्ये कडधान्याचा समावेशामुळे प्रथिने उपलब्ध होते. टरफले न काढलेल्या कडधान्यात 17 ते 43% प्रथिने असतात.

कडधान्ये मनुष्य प्राण्यांना उत्तम आहार देऊन त्यांचे स्वास्थ्य राखणे, जनावरांची उत्पादक क्षमता वाढविणे, जमिनीची पोत व मगदूर सुधारणे, आणि उदयोगधदयांना लागणारा कच्चामाल पुरवणे, अशी मागणी कार्य करतात. अशा कार्यामुळे कडधान्यांची मागणी लोकसंख्या वाढी बरोबर वाढत आहे.भारतात कडधान्यांचा उत्पादनात मध्यप्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, आणि उत्तरप्रदेश, ही राज्ये अग्रेसर आहेत.महाराष्ट्रामध्ये विशेष म्हणजे विदर्भ मराठवाडयात कडधान्यांचे अधिक उत्पादन घेतले जाते.कडधान्ये उत्पादन वाढविण्यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान 2007-08 मध्ये केद्र सरकार मार्फत राबविण्यात येते या योजनेत 17 राज्यामधील 476 निवडक जिल्हयाचा समावेश केला आहे.यात महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्हयाचा देखिल समावेश करण्यात आला आहे.त्यामुळे महाराष्ट्रातील कडधान्ये उत्पादन, उत्पादकता आणि क्षेत्र आणि नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता यांचा तुलनात्मक अभ्यास करणे गरजेचे आहे.

## संशोधनाची उदिदृष्टे :-

1) महाराष्ट्रातील कडधान्ये पिका खालील क्षेत्र आणि नंदुरबार जिल्हयातील कडधान्य पिका खालील क्षेत्र याचे तुलनात्मक अध्ययन करणे.
2) महाराष्ट्रातील कडधान्ये उत्पादन आणि नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये उत्पादन याचे तुलनात्मक अध्ययन करणे.
3) महाराष्ट्ारतील कडधान्ये उत्पादकता आणि नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये उत्पादकता याचे तुलनात्मक अध्ययन करणे.
4) नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये पिका खालील क्षेत्र, उत्पादन, आणि उत्पादकता वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

## गृहितके:-

1) नंदुरबार जिल्हयात कडधान्ये पिकांच्या लागवडी खालील क्षेत्रात अतिशय मंदगतीने वाढ होत आहे.
2) महाराष्ट्रातील एकूण कडधान्ये उत्पादनात नंदुरबार जिल्हयातील कडधान्याचे उत्पादन 2007-08 पासुन वाढत आहे.
3) महाराष्ट्राच्या तुलनेत नंदुरबार जिल्हयातील कडधान्याची उत्पादकता जास्त आहे.

## संशोधन पध्दती:-

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व व्दितीय साधन सामग्रीचा वापर केला असून प्राथमिक साधनात कडधान्ये उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा, निरिक्षणे केली आहेत.व्दितीय साधन सामग्रीत विविध संदर्भ ग्रंथ अहवाल मासिके, वर्तमानपत्र, वेबसाईट यांचा आधार घेण्यात आला आहे.

नंदुरबार जिल्हयाची निर्मिती 1 जुलै 1998 मध्ये झाली.नंदुरबार जिल्हयाने राज्याचा एकूण क्षेत्रापैकी 1.60% म्हणजेच 4.933 किलोमीटर क्षेत्र व्यापले असून राज्यात क्षेत्रफळाच्या क्रमवारीमध्ये जिल्हयाचे 30 व्या क्रमांकाचे स्थान आहे.जिल्हयातील जमीन ढोबळमानाने हलकी, मध्यम प्रतीची आणि कसदार या तीन प्रकारात मोडते.जिल्हयात तांदूळ, ज्वारी, बाजरी, तुर, भुईमुंग, मका, गहू, मुग, चवळी, उडीद, हरभरा, सोयाबीन, मिरची, ऊस, पपई इ.पिके प्रामुख्याने घेतली जातात.यात कडधान्ये पिकांमध्ये तूर, मूग, उडीद, चवळी, हरभरा, मसुर, वाल, मटकी, कुळीथ इ.समावेश केला जातो.नंदुरबार जिल्हयात कडधान्याचे उत्पादन घेतले जाते.निर्सगाच्या अनुकूल व प्रतिकूलते नूसार कडधान्याचा उत्पादनात व लागवडीत बदल होत असते.महाराष्ट्रातील कडधान्ये लागवडी खालील क्षेत्राशी नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये पिका खालील क्षेत्राचे तुलनात्मक विश्लेषण पुढील प्रमाणे.

**तक्ता क्र-1**

**नंदुरबार जिल्हयातील कडधान्य पिका खालील क्षेत्र आणि महाराष्ट्रातील कडधान्ये पिका खालील क्षेत्र याची तुलना (आकडेवारी हेक्टरमध्ये)**

| अ.नं | वर्ष | कडधान्याखालील क्षेत्र (हेक्टर) | | शे.प्रमाण महाराष्ट्रातील क्षेत्रा बरोबर |
|---|---|---|---|---|
| | | नंदुरबार | महाराष्ट्र | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | 2000-01 | 1433 | 98243 | 1.45% |
| 2 | 2001-02 | 1313 | 94106 | 1.39% |
| 3 | 2002-03 | 1230 | 92306 | 1.33% |
| 4 | 2003-04 | 1301 | 85614 | 1.51% |
| 5 | 2004-05 | 1369 | 92099 | 1.48% |
| 6 | 2005-06 | 1226 | 93032 | 1.31% |
| 7 | 2006-07 | 1384 | 96149 | 1.43% |
| 8 | 2007-08 | 1438 | 91258 | 1.57% |
| 9 | 2008-09 | 1352 | 83243 | 1.62% |
| 10 | 2009-10 | 1496 | 87348 | 1.71% |
| 11 | 2010-11 | 1591 | 89854 | 1.77% |
| 12 | 2011-12 | 1358 | 75644 | 1.79% |
| 13 | 2012-13 | 1444 | 74421 | 1.94% |

**संदर्भ:-www.mahaagri.gov.in**

वरील माहितीच्या आधारे असे दिसून आले की, नंदुरबार जिल्हयामध्ये 2000-01 मध्ये 1 हजार 433 हेक्टर क्षेत्राखाली कडधान्याचे पिक घेतले जाते.तर महाराष्ट्रात एकूण 98 हजार 243 हेक्टर क्षेत्राखाली कडधान्याची पिके घेतली जात होती.याच काळात नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये महाराष्ट्रातील कडधान्याच्या तुलनेत 1.45% एवढया क्षेत्रात होते.

सन 2006-07 मध्ये नंदुरबार जिल्हयामध्ये 1 हजार 384 हेक्टर क्षेत्र कडधान्ये पिकाखाली होते. तर महाराष्ट्रात याच काळात 96 हजार 149 हजार हेक्टर क्षेत्र कडधान्ये पिकाखाली होते. महाराष्ट्राच्या तुलनेत नंदुरबार जिल्हयात 1.43% एवढे क्षेत्र होते.

सन 2012-13 मध्ये 1 हजार 444 हेक्टर क्षेत्र नंदुरबार जिल्हयात कडधान्ये पिकाखाली होते.तर महाराष्ट्रात 74 हजार 421 हेक्टर क्षेत्र कडधान्ये पिकाखाली होते.महाराष्ट्र्रच्या तुलनेत नंदुरबार मध्ये 1.94% क्षेत्र कडधान्याचे आहे.म्हणजेच नंदुरबार जिल्हयामध्ये महाराष्ट्राच्या तुलनेत कडधान्ये पिकाचे क्षेत्र 2000-01 ते 2012-13 पर्यत सरासरी 1.56% आहे.

नंदुरबार जिल्हयातील कडधान्याचे उत्पादन आणि महाराष्ट्रातील कडधान्याचे उत्पादन याचा तुलनात्मक अभ्यास पुढील प्रमाणे.

**तक्ता क्र-2**

**नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये उत्पादन आणि महाराष्ट्रातील कडधान्ये उत्पादन (टन मध्ये)**

| अ.नं | वर्ष | कडधान्ये उत्पादन (टन) | | महाराष्ट्रातील उत्पादनाशी नंदुरबार जिल्हयाचे उत्पादन (शे.प्रमाण) |
|---|---|---|---|---|
| | | नंदुरबार | महाराष्ट्र | |
| 1 | 2000-01 | 751 | 84965 | 0.88% |
| 2 | 2001-02 | 1326 | 93053 | 1.42% |
| 3 | 2002-03 | 1194 | 87730 | 1.36% |
| 4 | 2003-04 | 1596 | 83620 | 1.90% |
| 5 | 2004-05 | 1218 | 88628 | 1.37% |
| 6 | 2005-06 | 1637 | 97758 | 1.46% |
| 7 | 2006-07 | 1443 | 105886 | 1.36% |
| 8 | 2007-08 | 2509 | 124625 | 2.01% |
| 9 | 2008-09 | 2011 | 95236 | 2.11% |
| 10 | 2009-10 | 2122 | 102175 | 2.07% |
| 11 | 2010-11 | 2687 | 123167 | 2.18% |
| 12 | 2011-12 | 2822 | 104265 | 2.70% |
| 13 | 2012-13 | 2677 | 88820 | 3.01% |

**संदर्भ:-www.mahaagri.gov.in**

वरील आकडेवारीवरुन असे स्पष्ट होते की सन 2000-01 मध्ये नंदुरबार जिल्हयात कडधान्यांचे उत्पादन 751 टन होते.तर महाराष्ट्रात 84965 टन एवढे कडधान्यांचे उत्पादन होते.महाराष्ट्रातील कडधान्याच्या उत्पादनाच्या तुलनेत नंदुरबार जिल्हयात कडधान्याचे उत्पादन फक्त 0.88% एवढे होते.

सन 2007-08 मध्ये महाराष्ट्रात एकूण कडधान्याचे उत्पादन 124625 टन कडधान्याचे उत्पादन झाले.यात नंदुरबार जिल्हयाचे 2509 टन एवढे कडधान्याचे उत्पादन आहे.महाराष्ट्राशी नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये उत्पादनाचे शेकडा प्रमाण 2.01% एवढे आहे.

2012-13 मध्ये महाराष्ट्रात कडधान्याचे उत्पादन 88820 टन एवढे झाले.तर नंदुरबार जिल्हयात 2677 टन एवढे उत्पादन कडधान्याचे झाले.महाराष्ट्राशी नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये उत्पादनाचे शेकडा प्रमाण 3.01% एवढे 2012-13 या वर्षाचे आहे.

उत्पादनाप्रमाणेच महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्हयांमध्ये दर हेक्टरी कडधान्य उत्पादकता ही कमी-जास्त दिसून येते.महाराष्ट्राच्या तुलनेत नंदुरबार जिल्हयांतील कडधान्याची उत्पादकता पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**तक्ता क्र-3**

**नंदुरबार जिल्हयातील कडधान्याची दर हेक्टरी उत्पादकता आणि महाराष्ट्रातील कडधान्याची दर हेक्टरी उत्पादकता याचे तुलनात्मक विश्लेषण (कि.ग्रॅ मध्ये)**

| अ.नं | वर्ष | कडधान्याचे दर हेक्टरी उत्पन्न (कि.ग्रॅ) | | महाराष्ट्रातील कडधान्याचे दर हेक्टरी उत्पन्नाशी नंदुरबार जिल्हयाचे उत्पन्नाचे शे.प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | | नंदुरबार | महाराष्ट्र | |
| 1 | 2000-01 | 524 | 865 | 60.57 |
| 2 | 2001-02 | 1010 | 989 | 102.12 |
| 3 | 2002-03 | 971 | 950 | 102.21 |
| 4 | 2003-04 | 1227 | 977 | 125.58 |
| 5 | 2004-05 | 889 | 962 | 92.41 |
| 6 | 2005-06 | 1335 | 1051 | 78.72 |
| 7 | 2006-07 | 1042 | 1101 | 105.66 |
| 8 | 2007-08 | 1745 | 1366 | 128.40 |
| 9 | 2008-09 | 1487 | 1144 | 129.98 |
| 10 | 2009-10 | 1419 | 1170 | 121.28 |
| 11 | 2010-11 | 1689 | 1371 | 123.19 |
| 12 | 2011-12 | 2078 | 1378 | 150.79 |
| 13 | 2012-13 | 1855 | 1193 | 155.49 |

**संदर्भ:-www.mahaagri.gov.in**

कडधान्याचा दर हेक्टरी उत्पन्नाचे अध्ययन करतांना असे आढळते कि 2000-01, 2004-05, 2005-06 या तीन वर्षाच्या काळात नंदुरबार जिल्हयात 524, 889, 1335 कि.ग्रॅम दर हेक्टर कडधान्याचे उत्पन्न झाले.हे प्रमाण महाराष्ट्राच्या तुलनेत अनुक्रमे 60.57%, 92.41% आणि 78.72% दर हेक्टरी उत्पन्न होते.या काळात महाराष्ट्रात कडधान्याचे दर हेक्टरी उत्पादकता अनुक्रमे 865, 962 आणि 1051 एवढे राहीली.या काळात निर्सगाच्या लहरीपणामुळे महाराष्ट्रातील कडधान्याच्या दर हेक्टरी उत्पन्नाच्या तुलनेत नंदुरबार जिल्हयात दर हेक्टरी कडधान्याचे उत्पन्न कमी झालेले आहे.

**निष्कर्ष:-**

महाराष्ट्रातील एकूण कडधान्ये पिकाखालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता याच्याशी नंदुरबार जिल्हयातील एकूण कडधान्ये पिकाखालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता याचे तुलनात्मक विश्लेषणात असे आढळते की नंदुरबार जिल्हयातील एकूण कडधान्ये पिकाखालील क्षेत्रात जास्त वाढ झालेली नाही. 2000-01 पासून 2012-13 पर्यंत नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये पिकाखालील क्षेत्र सरासरी 1.56% एवढेच आहे.यात सर्वात जास्त म्हणजे 2012-13 मध्ये 1.94% एवढे क्षेत्र कडधान्याचे महाराष्ट्रातील एकूण क्षेत्रात हिस्सा आहे.

महाराष्ट्रातील एकूण कडधान्ये उत्पादनाचा आढावा घेतांना असे निर्देशनात येते की, नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये उत्पादनात वाढ होत आहे. 2000-01 मध्ये नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये महाराष्ट्रातील एकूण कडधान्ये उत्पादनात 0.88% एवढा हिस्सा होता.2012-13 मध्ये महाराष्ट्राच्या एकूण कडधान्ये उत्पादनात नंदुरबार जिल्हयाचा हिस्सा 3.01% पर्यंत वाढला.

नंदुरबार जिल्हयातील कडधान्याची उत्पादकता महाराष्ट्रातील कडधान्याच्या उत्पादकते पेक्षा जास्त आहे.सन 2000-01 ते 2006-07 पर्यंत नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये उत्पादन, उत्पादकता, क्षेत्र याची वाढ मंदगतीने झाली आहे.उत्पादन, उत्पादकतेतील वाढीपेक्षा कडधान्य पिकाखालील क्षेत्र वाढ अतिशय मंदगतीने झालेली आहे.सन 2007-08 पासून केंद्र सरकार मार्फत राबविण्यात येणाऱ्या “राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान” या योजनेत कडधान्य पिकाचे क्षेत्रफळ, उत्पादन, उत्पादकता वाढविण्यावर भर दिला जातो.या योजनेत नंदुरबार जिल्हयाचा समावेश असल्यामुळे सन 2007-08 पासुन 2012-13 पर्यंत कालखंडात नंदुरबार जिल्हयातील कडधान्ये पिकाखालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता, यात वाढ होत आहे.

## उपाय-योजना:-

नंदुरबार जिल्हयामध्ये कडधान्ये पिक घेण्यासाठी अनुकूल वातावरण आहे. परंतू बऱ्याच शेतकऱ्यांकडून तुर, मूग, उडीद, हरभरा, यासारखे कडधान्ये स्वत:च्या गरजे एवढेच आणि ते सुध्दा मिश्र पिक म्हणून घेतले जात असते. त्याच प्रमाणे सुधारित बि-बियाण्याचा वापर केला जात नाही.कडधान्ये पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी सुधारित बि-बियाण्याचा वापर केला जावा.कडधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी असलेल्या शासकिय योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचाव्यात शेतकऱ्यांना आधुनिक पध्दतीने शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना जागृत केले पाहिजे.त्याच प्रमाणे शेतकऱ्यांच्या कडधान्ये पिकाला योग्य किंमत दिल्यास कडधान्याचे उत्पादन वाढविता येऊ शकते. बाजारपेठेतील मध्यस्थाचे प्रमाण कमी करुन शेतक:यांची पिळवणुक कमी केली पाहीजे. शेतकरी हिताच्या वेगवेगळ्या धोरणाचे योग्य अंमलबजावणी केल्यास कडधान्ये पिकाखालील क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता वाढविता येईल.

## संदर्भ:-


1) भा.अ.फडणीस :- अ.ख्रं.गुप्ते :- महाराष्ट्रातील कडधान्ये
2) प्रा.डॉ.दिलीप कुलकर्णी:- नंदुरबार जिल्हा व सौ.मीनाक्षी कुलकर्णी मागदर्शक पुस्तिका
3) दै.सकाळ ॲग्रोवन (24 फेब्रुवारी 2015)
4) दै.लोकमत (25 सप्टेबर 2015)
5) आर्थिक सर्वेक्षण 2011-12
6) www.mahaagri.gov.in
7) कृषी अर्थशास्त्र-डॉ.निता वाणी
8) कृषी अर्थशास्त्र- डॉ.एस.बी.कटमुसरे
9) कडधान्य लागवड ते प्रक्रीया उद्योग- डॉ.यु.डी.चव्हाण
10) कृषी प्रक्रिया उद्योग- जगन्नाथ शिंदे
11) भारतीय अर्थव्यवस्था एक दुष्टीक्षेप-डॉ. डी.जी.पाटील, डॉ.मंगला जंगले, प्रा.डी.आर. जगताप, प्रा.निता वाणी